झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

जा.क्र. झोपुप्रा/नुकाअ/झोपुयो स्विकृती/६७४/२०१७.

दिनांक: २६ ऑक्टोबर २०१७.

**कार्यालयीन आदेश:**

**विषय**: झोपडपट्टी पुनर्वसन योजनांचे प्रस्ताव स्विकारणेबाबत.

**संदर्भ**: १. झो.पु.प्राधिकरणाचे परिपत्रक क्र. १४१, दिनांक ४.०५.२०१३.
२. झो.पु.प्राधिकरणाचे परिपत्रक क्र. १४४, दिनांक ३१.०८.२०१३.
३. झो.पु.प्राधिकरणाचे कार्यालयीन आदेश दिनांक ०२.०२.२०१५.
४. झो.पु.प्राधिकरणाचे परिपत्रक क्र.१४४अ, दिनांक ९.११.२०१५.
५. झो.पु.प्राधिकरणाचे परिपत्रक क्र. १४४ब, दिनांक २८.१२.२०१५.
६. झो.पु.प्राधिकरणाचे परिपत्रक क्र. १४४क, दिनांक २६.०५.२०१६
७. झो.पु.प्राधिकरणाचे परिपत्रक क्र. १६८, दिनांक ३१.१२.२०१५.

बृहन्मुंबई महानगरपालीका क्षेत्रातील शासकीय, निमशासकीय व खाजगी जमिनीवर असलेल्या झोपडपट्ट्यांचा विकास करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालीका विकास नियंत्रण नियमावली १९९१ मधील नियम ३३(१०) अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे स्विकृत केले जाणारे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे प्रस्ताव दाखल करणेची कार्यपद्धती झो.पु.प्राधिकरणाचे संदर्भिय परिपत्रक क्र. १४४ व त्यानंतरची पारित केलेली सुधारीत परिपत्रके, कार्यालयीन आदेश याद्वारे निश्चित करण्यात आली आहे.

२. परिपत्रक क्र. १४४ नुसार "सर्व विभाग प्रमुखांचे स्वयंस्पष्ट अभिप्राय संबधित विभागाच्या कार्यकारी अभियंता, अभियांत्रिकी विभाग, झो.पु.प्रा. यांचेकडे प्राप्त झाल्यानंतर प्राप्त प्रस्तावाची छाननी करून कार्यकारी अभियंता प्रस्ताव स्विकारणे/नाकारणे याबाबत आवश्यक कार्यवाही करतील अशा सूचना दिल्या होत्या." त्यानुसार संबधित कार्यकारी अभियंता यांचे स्तरावर योजना स्विकृतीची कार्यवाही (Acceptance of the Scheme) होत होती.

३. तथापी, झो.पु.प्राधिकरणात दाखल होणा-या झोपडपट्टी पुनर्वसन योजनांच्या हद्दी या वेड्यावाकड्या असल्याने पुनर्वसन व विक्री घटकाच्या इमारतीचे बांधकाम नियोजनासाठी ब-याच अडचणी येत असल्याने (lot of planning constraint for insitu redevelopment) व वेगवेगळी आरक्षणे विचारात घेऊन झोपडपट्टी क्षेत्राचे योग्य नियोजन करणे शक्य होत नाही असे लक्षात आल्याने बृहन्मुंबई महानगरपालीका विकास नियंत्रण नियमावली १९९१ मधील नियम ३३(१०) चे परिशिष्ट IV च्या उपनियम (Clause) ३.१६ मधील "The Chief Executive Officer, SRA may if required adjust the boundary of the plot declared as slum rehabilitation area, so as to suit the building design & provide proper access to the project" या तरतुदीनुसार सदर आदेशाच्या दिनांकापासून पुढे प्राप्त होणारे प्रस्ताव स्विकारण्याची अंतिम कार्यवाही मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावरून करण्यात येईल असे तत्का. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक ०२.०२.२०१५ च्या आदेशान्वये निर्देशित केले होते.

४. उपरोक्त आदेशानुसार प्राधिकरणात प्राप्त होणा-या सर्व योजनांचे प्रस्ताव स्विकृत करण्याचे अंतिम निर्णयास्तव मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे पाठविण्यात येतात. झोपडपट्टी पुनर्वसन योजना जलदगतीने राबविणे व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या गुणात्मक विकासाच्या दृष्टीकोनातून धोरणात्मक निर्णय घेण्यास वाव मिळावा यास्तव, झोपडपट्टी पुनर्वसन योजनांचे प्रस्ताव स्विकृतीबाबत खालीलप्रमाणे कार्यपद्धती अवलंबिण्यात यावी.

प्रशासकीय इमारत, प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१
[illegible] फॅक्स : ०२२-२६५९ ०४५७, ई-मेल : info@sra.gov.in